स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयात पी. एच. डी.

संशोधन प्रकल्प आराखडा

: अभ्यास केंद्र :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

: संशोधनाचा विषय :

जन जीवनाचे अर्थशास्त्रीय स्वरूप आणि महात्मा बसवेश्वरांचे अर्थमितीय विचार : एक तौलनिक अर्थशास्त्रीय अभ्यास

: संशोधक :

आनंद बळीराम कर्णे

: मार्गदर्शक :

प्राचार्य डॉ. स्वामी एस. डी.

प्राचार्य, अर्थशास्त्र विभाग प्रमुख व
संशोधन मार्गदर्शक
श्री दत्त कला, वाणिज्य, विज्ञान
महाविद्यालय, हदगांव
ता. हदगांव जि. नांदेड

: सन :

जुलै 2021

जन जीवनाचे अर्थशास्त्रीय स्वरूप आणि महात्मा बसवेश्वराचे अर्थमितीय विचार: एक तौलनिक अर्थशास्त्रीय अभ्यास.

प्रस्तावना :

सद्‌य: परिस्थितीत देशात वाढत चाललेल्या गरीब व श्रीमंत यातील दरी कमी होऊन आर्थिक समतेकडे वाटचाल केली पाहिजे. म्हणजेच कार्ल मार्क्सला अभिप्रेत असलेली समाजवादी समाजरचना 12 व्या शतकात महात्मा बसवेश्वरांना अभिप्रेत होती. महात्मा बसवेश्वरांच्या मते स्त्री - पुरूष समानता अस्तित्वात आली पाहिजे. त्याच बरोबर अंधश्रध्दा, जातीभेद, बालविवाह, कर्मकांड, वर्णभेद, अस्पृश्यता व सतीप्रथा इत्यादी जुन्या सनातनी वैदिकांच्या अमानुष प्रथेविरूध्द महात्मा बसवेश्वर बंड करून उठले. त्यामुळेच त्यांना समाज क्रांतीकारकांच्या माध्यमातुन ग्रंथ प्रामाण्याला नकार, वर्णव्यवस्थेचा धिक्कार, अस्पृश्यतेवर प्रहार आणि समता, बंधुता व स्त्री - स्वातंत्र्याचा पुरस्कार, अंतरंग - बहिरंग शुध्दतेचे समर्थन, नारी सन्मान, सामानाधिकार, श्रमगौरव व व्यक्तीची सामाजिक बांधिलकी इत्यादीचा पुरस्कार करून सामाजिक क्रांतीच्या माध्यमातुन मानवी जीवनाचा विकास साध्य केला. त्यामुळे महात्मा बसवेश्वर हे धर्माच्या, जातीच्या नावाखाली चाललेल्या शोषणाच्या विरूध्द बंड करणारा पहिला क्रांतीकारी म्हणून ओळखले जातात. तसेच महात्मा बसवेश्वर आणि त्यांचा धर्मनिरपेक्ष “अनुभव मंटप” आजही समाजाला मार्गदर्शक ठरत असल्याचे पाहावयास मिळते. महात्मा बसवेश्वरांचे विचार हे साम्यवादी असून हे विचार महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, लेनिन, राजाराममोहन रॉय, राजर्षी शाहू महाराज व महर्षी कर्वे यांच्या विचाराशी समरूप असून महात्मा बसवेश्वरांच्या मते समाजाचे आर्थिक जीवनही सामाजिक समतेवर व सामाजिक न्यायावर आधारलेले असणे आवश्यक आहे. त्यामुळेच समाजातील कष्ठकरी वर्ग आजच्या उत्पादन कार्यात महत्त्वाची

भुमिका निभावतो आहे. आधुनिक अर्थशास्त्रातील उत्पादनाच्या घटकांचे व अर्थशास्त्राचे स्वतंत्र स्वरूप मान्य होण्यापुर्वीच महात्मा बसवेश्वरांनी श्रम, निसर्ग, भांडवल व संघटक या चार उत्पादन घटकांना प्राधान्य दिले.

उत्पादनातील सर्वात महत्वाचा घटक म्हणून श्रमिकांना प्राधान्य दिले. त्यामुळेच कायकवे कैलास म्हणजेच श्रम हाच स्वर्ग होय. असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वरांनी केले. या देशात खालच्या वर्गातील लोकांनी स्वत:च्या श्रमाने केलेले उत्पादन उच्च वर्णीय लोक उत्पादन व्यवस्थेचे मालक व उपभोक्ते म्हणून जगत होते. त्यामुळे या समाज व्यवस्थे विरूध्द ते बंड करून उठले. जनजीवनाचे अर्थशास्त्र अभ्यासतांना प्रत्येक व्यक्तीला त्याचा उदरनिर्वाह व मुलभुत गरजांची पुर्तता करता येणे शक्य होईल इतके उत्पन्न अर्थ व्यवस्थेत प्राप्त झाले पाहिजे व हे उत्पन्न त्या व्यक्तीला रोजगारातुन प्राप्त झाले पाहिजे व जेथे श्रम करणे अशक्य आहे अशा व्यक्तीच्या संदर्भात दासोह म्हणजेच कमविलेल्या संपत्तीचे गरजु लोकांमध्ये वितरण करणे आवश्यक आहे. तसेच उपभोग घेणाऱ्या पर्यंत उपभोग्य माल पोहचविणे हे सुध्दा कायक आहे. व्यक्ती, समाज किंवा जगाचे व्यवहार उत्पादना विना चालुच शकणार नाहीत. तसेच उत्पादित मालाचे वितरण उपभोक्त्यामध्ये होणे आवश्यक आहे. यालाच वितरण प्रणाली म्हटले जाते. त्यामुळेच अर्थशास्त्रातील उत्पादन व वितरण या सज्ञांना महात्मा बसवेश्वरांनी कायक व दासोह म्हटले एवढेच. तसेच 12 व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी पैसा साठविणे, संपत्तीचा संग्रह करणे व त्यावर व्याज वसूल करणे या बाबीही अर्थ व्यवस्थेत अयोग्य असून सावकारी वृत्तीचा धिक्कार केला आहे. त्यामुळेच महात्मा बसवेश्वरांचे अर्थमितीय विचार जनजीवनाचे अर्थशास्त्र समजुन घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

महात्मा बसवेश्वरांचे अर्थमितीय विचार

संशोधन विषयाचे महत्त्व :

सध्याच्या अर्थव्यवस्थेत बेरोजगारी, आर्थिक विषमता, दारिद्य यात दिवसेंदिवस वाढ होत असून यावर उपाय शोधण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी 12 व्या शतकात 'Work is Heaven' म्हणजेच 'कायकवे कैलास' म्हणजेच 'श्रम हाच स्वर्ग' असे म्हटले आहे. श्रमाची प्रतिष्ठा वाढविल्याशिवाय प्रत्येक व्यक्ती हा श्रम करण्यासाठी तयार होणार नाही. तसेच दारिद्य निर्मुलनासाठी प्रत्येक व्यक्तीला रोजगार देणे आवश्यक असून उदयोग म्हणजेच स्वर्ग हे धोरण स्विकारणे आवश्यक आहे. तसेच सद्याच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता मोठया प्रमाणात वाढत असून त्यामुळे अर्थव्यवस्थेत लोकांच्या कार्यक्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम होत असून लोकांची कार्यक्षमता उंचाविण्यासाठी आर्थिक समता, सामाजिक समता, सामाजिक न्याय व आर्थिक न्याय या बाबी आवश्यक आहेत व त्यामुळेच या सर्व बाबींचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करून लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी 12 व्या शतकात केला. त्यामुळेच बेरोजगारी, वाढती आर्थिक विषमता व दारिद्य यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करण्यासाठी व शाश्वत विकासाकडे वाटचाल करण्यासाठीच या विषयाची निवड करण्यात आली.

विषय निवडीचे कारण :

प्रसिध्द भारतीय नोबेल पारीतोषीक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनी मानवी भांडवलाचा विकास करणे आवश्यक असून आर्थिक विकासातील तो एक महत्त्वाचा घटक मानला जातो. त्यामुळे टी. डब्ल्यू. शूल्टझ, इरबिसन, टेनीसन, कॅजरिक, ऑब्रीमोव्हीज बेकर, बोमॉन, क्रुगर, कुंट, गालब्रेथ, अर्थर लेविज व मेकलेलँड इ. आर्थिक विकासाचे मानवी

भांडवलाशी संबंध असल्याचे प्रतीपादन केले. इ. स. 1926 पासून जेव्हा जागतीक अर्थव्यवस्थेत अर्थमितीची सुरूवात करण्यात आली. त्यावेळेस

1. आर्थिक विधानाचे गणितीकीकरण
2. आर्थिक विश्लेषणाची गतिमानता
3. सेध्दांतिक तत्वज्ञानाचे तात्वीक दृष्टीकोनातून पडताळणीकरण करणे

या तीन बाबींना अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. परंतू मानवाची कार्यक्षमता, उत्पादन क्षमता वाढवून आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी मानवी भांडवलाची गुंतवणुक करणे आवशयक आहे. तसेच सध्याच्या कालखंडात जगात दारिद्याचे प्रमाण वाढत आहे. त्याच बरोबर जगात बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. परंतु शेतातील कामगाराचे प्रमाण कमी होत असून त्यामुळे शेतीकामगाराचा तुटवडा दिसून येत आहे आणि त्याच मुळे जगात प्रदूषणाचे प्रमाणसुध्दा वाढत चालले आहे. त्यामुळेच आर्थिक विषमता सुध्दा दिवसें दिवस वाढत असल्याचे आपणाला दिसून येते, याचे खरे कारण

1. लोकसंख्येचा स्फोट
2. लोकांच्या अपेक्षांचा स्फोट
3. ज्ञानाचा स्फोट

हा तीनी प्रकारचा स्फोट इ. स. 1980 नंतर जगात झालेला आहे. त्यामुळे या सर्वांवर उपाय म्हणून महात्मा बसवेश्वरांनी 12 व्या शतकात Work is heaven म्हणजेच कायकवे कैलास म्हणजेच श्रम हाच स्वर्ग आणि दासोह ही संकल्पना समाजात वाढविण्याची गरज आहे. त्यामुळेच महात्मा बसवेश्वरांचे अर्थमितीय विचार अभ्यासणे ही काळाची गरज आहे. तसेच विकास म्हणताना दृष्य स्वरूपाचे राहणीमान व अदृष्य स्वरूपाचे जिवनमान उंचावण्यासाठी महात्मा बसवेश्वरांचा अनुभव मंटपातील 14 अटीचे काटेकोरपणे पालन होणे

आवश्यक आहे. त्यासाठीच महात्मा बसवेश्वरांचे अर्थमितीय विचार जन जिवनाचे अर्थशास्त्र समजुन घेण्यासाठी उपयुक्त ठरतात. यासाठीच हा विषय अभ्यासासाठी निवडण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

संशोधनाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

1. जन जीवनाचे अर्थशास्त्रीय स्वरूप समजुन घेणे.
2. महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक व अर्थमितीय विचार अभ्यासणे.
3. महात्मा बसवेश्वरांनी केलेल्या सामाजिक सुधारणेतील आर्थिक विकासाचे स्वरूप स्पष्टपणे अभ्यासणे.
4. मानवी जीवनातील श्रमाचे महत्त्व व त्या पध्दतीने अर्थव्यवस्थेने आर्थिक धोरण ठरवून अर्थव्यवस्थेच्या मनुष्यबळाचे नियोजन अभ्यासणे.
5. आधुनिक अर्थशास्त्र उदयास येण्यापुर्वीचे उत्पादनाचे घटक अभ्यासणे.
6. व्यवसाय स्वातंत्र्याचे महत्त्व अभ्यासणे.
7. अर्थशास्त्राचे अर्थशास्त्रीय व अर्थमितीय विचार अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके :

1. वाढती बेरोजगारी ही श्रमाचे महत्व कमी झाल्यामुळे निर्माण झाली.
2. आर्थिक विकास हा सामाजिक समता व सामाजिक न्याय यावरच आधारित आहे.
3. व्यवसाय स्वातंत्र्यामुळे आर्थिक विकास जास्त करता येतो.
4. श्रम व उत्पन्नाचे स्वरूप धनात्मक आहे.
5. महात्मा बसवेश्वरांचे अर्थमितीय विचार हे आधूनिक जगतातील ज्वलंत समस्यांचे निराकरण करण्यास पर्याप्त आहेत.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व व्दितीयक सांख्यिकीय सामुग्रीचा अभ्यास केला जाणार असून प्राथमिक स्त्रोतात प्रश्नावली व मुलाखतीच्या आधारे सद्याच्या आधुनिक युगातील मानवी श्रमाचे महत्व जाणुन घेणे, व्यवसाय स्वातंत्र्याचे उत्पन्न व कार्यक्षमतेशी असलेले संबंध अभ्यासले जाणार असून महात्मा बसवेश्वरांनी मांडलेली कायकवे कैलास ही संकल्पना अभ्यासून सद्याच्या अर्थव्यवस्थेत त्याची उपयुक्तता जाणुन घेऊन बेरोजगारी निर्मुलनासाठी ती कितपत उपयुक्त आहे याचा अभ्यास केला जाईल. तसेच व्दितीयक सामुग्रीच्या आधारे महात्मा बसवेश्वराच्या अर्थमितीय विचारांचा अभ्यास करून मानवी जीवनातील श्रमाचे महत्व, उत्पादनाचे घटक, व्यवसाय स्वातंत्र्य यातुन जनजीवनाचे अर्थशास्त्रीय स्वरूप समजुन घेतले जाईल.

प्रस्तुत संशोधनात काही निवडक संख्याशास्त्रीय तंत्राचा अवलंब केला जाणार असून त्यात सांख्यिकीय माध्य, प्रचरण विषमता, सहसंबंध व मानव विकास निर्देशांक इत्यादी तंत्राच्या आधारे अर्थव्यवस्थेचे मुल्यमापन केले जाईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

सद्याच्या अर्थव्यवस्थेत बेरोजगारी, आर्थिक विषमता, दारिद्य व प्रदुषण याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असून आधुनिक कालखंडात आर्थिक विकासात ही वाढ होत आहे. असे दर्शवित असताना आर्थिक विकासातील वृध्दी ही बेरोजगारी कमी करणारी व त्याच बरोबर आर्थिक विषमता ही वाढणार नाही. व दारीद्यालाही अडसर निर्माण करेल यासाठी उत्पन्न मिळविण्यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. त्यामुळे हा विषय मानवी जनजीवनासाठी व्याप्त विषय आहे. त्याच बरोबर श्रमाच्या प्रतिष्ठेतुन उदयोजकता विकसीत करून लोकांना जबाबदारी व कर्तव्याची जाणीव करून देणे व त्याचबरोबर दारिद्य

निर्मुलनासाठी विविध प्रकारचे प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे जनजीवनाचे अर्थशास्त्रीय स्वरूप व महात्मा बसवेश्वरांचे अर्थमितीय विचार याचा तौलनिक अभ्यास करणे आवश्यक आहे.

महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार हे मोठया प्रमाणात कन्नड भाषेत संपादित करण्यात आले. परंतु मराठी भाषेत ते कमी प्रमाणात संपादीत करण्यात आले. त्यामुळे ही या संशोधनावर थोड्याशा मर्यादा पडतात. तरी परंतु महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार, सामाजिक विचार, राजकिय विचार लक्षात घेता त्यांची अनुभव मंटपाची संकल्पना व त्यासंदर्भातील अटी ह्या जगतातील मानवी जीवनाचे जीवनमान कसे उंचावता येईल याचेच निर्देशक ठरतात. त्यामुळे त्यांचा अर्थमितीय दृष्टिकोण हा पुरेसा व्यापक असून तो मानवी विकासासाठी पर्याप्त आहे.

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले : प्रस्तावना.

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा संक्षिप्त आढावा.

प्रकरण तिसरे : जनजीवनाचे अर्थशास्त्रीय स्वरूप आणि महात्मा बसवेश्वर.

प्रकरण चौथे : जनजीवनाचे अर्थशास्त्र आणि महात्मा बसवेश्वराच्या अर्थमितीय विचारांचे तौलनिक मुल्यमापन व गृहितकांची सिध्दता.

प्रकरण पाचवे : महात्मा बसवेश्वरांच्या अर्थमितीय विचारांचे संख्याशास्त्रीय तंत्राव्दारे तौलनिक मुल्यमापन.

प्रकरण सहावे : सुचना, निष्कर्श व शिफारशी.

संदर्भ सुची

1. डॉ. अशोक मेनकुदळे, “बाराव्या शतकातील आद्यसमाज सुधारक महात्मा बसवेश्वर”, सुविधा प्रकाशन 374, उत्तर कसबा सोलापूर, फेब्रुवारी 2003.
2. जगतगुरू माता महादेवी, ‘बसव धर्माचे संस्कार’ विश्वकल्याण मिशन बसव मंडप, 2035, (माताजी) 20 वी मुख्यरस्ता दुसरा ब्लॉक, राजाजी नगर, बेंगलूर, ऑक्टोंबर 1998.
3. डॉ. चंद्रशेखर कपाळे, ‘वीरशैव धर्माचा स्थुल इतिहास’, मगाई, 2 अ, अध्यापक नगर वीजापूर रोड, सोलापूर, एप्रिल 2005.
4. डॉ. शे. दे. पसारकर, ‘अष्टावरणय मगाई’, 2 अ, अध्यापक नगर, विजापूर रोड, सोलापूर एप्रिल 2005.
5. रं. शा. लोकापुर, ‘ज्ञानेश्वर कालीन मराठी भाषेवर कन्नडचा प्रभा’, निशांत प्रकाशन, बेळगाव, फेब्रुवारी 1994.
6. डॉ. अशोक कामत, ‘महात्मा बसवेश्वर’ सत्संग प्रतिष्ठाण पुणे, ऑगस्ट 1999.
7. आनंद कुंभार, ‘यशोधन तरंग’ तनवभारत प्रकाशन, मुंबई 1998.
8. डॉ. राजशेखर हिरेमठ, ‘वीरशैव संत साहित्य अभ्यासग्रंथ’ पुणे.
9. डॉ. ब्रम्हानंद देशपांडे, ‘शिवयोग विशेषांक’ अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य महामंडळ, वीरशैव ज्ञानकोष शिबीर औरंगाबाद, 1999.
10. प्रा आनंद बळीराम कर्णे, 21 व्या शतकाचे प्रेरणास्त्रोत महात्मा बसवेश्वर.
11. प्राचार्य डॉ. पी. ई. विभुते, जगतज्योती कांतदर्शी महात्मा बसवेश्वर - अरूणा प्रकाशन लातुर - 13 फेब्रुवारी 2016.
12. Dr. P. E. Vibhute (Ph. D. thesis) unpublished, District Development Plan: A case study of Nanded District - March 2000 SRTMU, Nanded.

13. Gerald M Meier, "Leading Issues in Economic Development" Oxford University Press, Mumbai] 1990.

14. Mahajan V. S. (Editor), "Agriculture Rural Development and Panchayati Raj, Regional level Strategies and policies. Vol. 2] Deep and Deep publications. New Delhi, 1996.

15. Myrdal Gunner, "Economic Theory and Underdeveloped region" vora and co (Indian Edition) Bombay, 1973.

16. Narayana D. L. : "Employment and Economic Development", A study of Technical Aspect. Andhra University, Waltair, 1958.

17. Sen Amartya, "Resources, Values and Development, Oxford University Press, Bombay, 1984.

18. Shrivastava S. C., "Foundations or 80 Cial Research and Econometric Technique Himalaya Publishing House, Bilaspur, 1990.

: संशोधक :

आनंद बळीराम कर्णे

: मार्गदर्शक :

प्राचार्य स्वामी एस. डी.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व

संशोधन मार्गदर्शक

श्री दत्त कला, वाणिज्य, विज्ञान

महाविद्यालय, हदगांव

ता. हदगांव, जि. नांदेड